**विषयः-** नांदेड जिल्हयातील वृत्तपत्र छपाई, विक्रीकरणारे एजंट/विक्रेता, इलेक्ट्रॉनिक मिडीया या माध्यमांना कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध करावयाच्या आवश्यक उपाय योजना/निर्देश बाबत.

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
क्र.2020/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/को./सीआर-
दि. ०१/०४/२०२०

वाचाः- १) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.
४) या कार्यालयाचे फौजदारी संहिता दंडप्रकियेचे कलम १४४ चे आदेश क्र.२०२०/आरबी-१/डेस्क-२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र. दि.२५.०३.२०२०
५) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.डीएमयू/२०२०/प्र.क्र.९२/डीएसएम-१ दिनांक २५ मार्च २०२०

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि ज्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले असून संदर्भ क्र.०५ वर नमूद अधिसूचने अन्वये जीवनाश्यक सेवा व वस्तु पुरवणा-या आस्थापना वगळण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रसार माध्यमे, वृत्तपत्रे (मिडीया) यांचे आस्थापनांचा समावेश आहे. सदर आस्थापनांच्या ठिकाणी योग्य त्या उपाययोजना केल्यास गर्दी टाळता येऊ शकते.

त्याअर्थी, मी डॉ.विपीन इटनकर (भा.प्र.से) , जिल्हाधिकारी, नांदेड साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतूदीनूसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जिल्हयातील वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक मिडीया व माध्यमांनी कोव्हीड-९ प्रतिबंध होण्याकामी खालील प्रमाणे उपाययोजना करण्याबाबत आदेशीत करीत आहे.

१) जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड यांनी वृत्तपत्रांचे वितरण करणारे एजंट/छपाई, विक्रेते व वाटप करणारे लाईन बॉय यांना ओळखपत्र द्यावे. त्यामध्ये ०५.०० ते सकाळी ०८.०० वाजे पर्यतचा वेळ नमूद करावी.

२) वर नमूद सर्वांनी ओळखपत्र बाळगावेत तसेच वृत्तपत्राचे वितरण सकाळी ०५.०० ते सकाळी ०८.०० या कालावधीतच करावे.

३) स्टॉल लाऊन वृत्तपत्र विक्रीस प्रतिबंध राहील.

Scanned by CamScanner

४) वृत्तपत्र छपाई व वितरणांच्या ठिकाणी हात धुण्याची व्यवस्था करण्यात यावी, तसेच एका ठिकाणी होणारी गर्दी टाळणेबाबत सर्वांना सुचना द्याव्यात.

५) कार्यालयामध्ये स्वच्छता ठेवावी व निर्जतुकीकरणाची फवाराणी करावी.

६) दोन व्यक्तींमध्ये किमान सहा फुटाचे अंतर ठेवण्यात यावे.

७) वृत्तपत्र वितरण कर्मचा-यांना सॅनिटायझर व मास्क उपलब्ध करुन द्यावेत.

सदर आदेश पुढील आदेशापर्यंत अमलात राहील तसेच, यापूर्वी या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निर्देश व परिपत्रके या आदेशासह अमंलात राहतील.

तसेच, सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधिताविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वा/-

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

०१. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी – आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
३. पोलीस अधीक्षक, नांदेड
४. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
५. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
६. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
७. सर्व समन्वय अधिकारी (नोडल अधिकारी)
८. जिल्हा माहीती अधिकारी, नांदेड
९. सर्व नांदेड जिल्हा वृत्तपत्र संघटना (मार्फत जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

OFFICE OF THE COLLECTOR NANDED.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned by CamScanner